**पुणे पत्रकार सहकारी गृहरचना संस्था (मर्यादित), पुणे - ४११ ०१६**
**दिनांक: १ जून, २०२३**
**विषय: दिनांक २८/५/२३ रोजी संस्थेच्या पुनर्निर्माण संबंधी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचा वृतांत.**

पुणे पत्रकार सहकारी गृहरचना संस्थेच्या पुनर्निर्माण प्रकल्पाच्या संदर्भात संस्थेच्या सभासद / सहयोगी सभासद यांची विशेष सर्व साधारण सभा दिनांक २८/५/२३ रोजी, सकाळी १० वाजता संस्थेच्या मधुकर जोशी सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या सभेत एकूण ७७ सभासद् / सहयोगी सभासद उपस्थित होते.
सभेच्या अध्यक्ष स्थानी संस्थेच्या कार्यकारिणी तसेच पुनर्निर्माण समिती चे अध्यक्ष श्री विजय सावंत होते. आवश्यक कोरम (६८) पूर्ण झाल्याने अध्यक्षांनी उपस्थितांचे स्वागत करून सचिव श्री विनायक पटवर्धन यांना सभेचे कामकाज सुरू करण्याची सूचना केली.

श्री पटवर्धन यांनी सभासदांना १०/५/२३ रोजीच्या तसेच २१/५/२३ रोजी पाठविलेल्या सुधारित नोटीसि प्रमाणे दिलेल्या कार्यक्रम पत्रिके नुसार प्रत्येक मुद्द्यावर चर्चा झाल्यावर तो ठराव मतदानास टाकण्यात येईल असे सांगितले.

*** ठराव क्रमांक १:**
पुनर्निर्माण योजनेत मिळणार्या वाढीव चटई क्षेत्रा चे वाटप (FSI) सभासदांकडे सध्या असणाऱ्या जागेच्या प्रमाणात टक्केवारी ने करणे.
ह्या विषया वर सभासदांनी आप आपली मतं मांडली. काही सभासदांनी ठरावा चे समर्थन केले तर काही ने वाढीव जागे चे वाटप सर्वांना सम समान प्रमाणात व्हावे असे विधान केले. ह्या चर्चेत श्री श्रीवर्धन गाडगीळ, श्री महेश प्रभुदेसाई, श्री चंद्रशेखर कारखानीस, श्री यशवंत केंजळे, श्रीमती निर्मला सावदेकर, श्री अनंत शाळिग्राम, श्री सुरेशचंद्र पाध्ये, श्री विजय लेले, श्री रोहन मोरे, श्री राजेश शाह, श्री निखिल गीत, श्री मोरश्वर जोशी, श्री जयंत शाळिग्राम, श्री किशोर जकाते आदींनी भाग घेतला.

ह्या चर्चे नंतर सचिवांनी ठराव क्रमांक १ मतदानास टाकला. यात ठरावाच्या बाजूने ३९ आणि विरुद्ध अशी २९ मतं पडली. ४ सभासद् तटस्थ तर ५ सभासद् मतदानाच्या वेळेस अनुपस्थित राहिले.

ह्या ठरावाला बहुमत मिळाले असले तरी पुनर्निर्माणासाठी आवश्यक अशी ५३ मतं न पडल्याने ठराव मंजूर अगर ना मंजूर असा निष्कर्ष न काढता, तसेच सभासदांचा कल बघता, अध्यक्षांनी सदर ठराव प्रलंबित ठेवत असल्याचे जाहिर केले.
ह्या ठरावा चे सूचक श्री जयराम देसाई आणि अनुमोदक श्री राजीव साबडे होते.
सभे चे पुढील कामकाज सुरू होण्या आधी ८ सभासद् मीटिंग सोडून बाहेर गेले त्या मुळे पुढील ठरावांच्या वेळी एकूण ६९ सभासद च उपस्थित होते. ही संख्या ही आवश्यक कोरम पेक्षा जास्त होती.

*** ठराव क्रमांक २:**
डुप्लेक्स फ्लॅट धारकांना वाढीव आकाराचा एकच डुप्लेक्स देणे.
ह्या विषयावर चर्चा करण्याची गरज नसल्याचे ध्वनित झाल्यामुळे हा ठराव मतदानासाठी टाकण्यात आला. यात ठरावाच्या बाजूने ६५, विरोधात १ आणि तटस्थ ३ असे मतदान झाले आणि त्या अनुसार हा ठराव मंजूर झाल्याचे सचिवांनी जाहीर केले.
ह्या ठरावा चे सूचक श्री राजाराम जोशी आणि अनुमोदक श्री वसंत जोगदेव हे होते.

*** ठराव क्रमांक ३:**
Betterment Charges म्हणून प्रत्येक सभासदास विकसकाकडून कमीत कमी रू. वीस लाख देणे.
मतदानानंतर सदर ठराव ६९ विरुद्ध 0 मतांनी संमत झाल्याचे सचिवांनी जाहीर केले.
ह्या ठरावाचे सूचक श्री श्रीवर्धन गाडगीळ तर अनुमोदक श्री अनिल टाकळकर होते.

*** ठराव क्रमांक ४ :**
समाज मंदिरा साठी २०००० (वीस हजार) चौरस फुटाचे व्यावसायिक बांधकाम पुनर्निर्माण प्रकल्पा चा भाग म्हणून विकसकाकडून करवून घेणे.

मतदाना नंतर हा ठराव ६९ विरुद्ध 0 मतांनी मंजूर झाल्याचे सचिवांनी जाहीर केले.ह्या ठरावाचे सूचक श्री चंदशेखर कारखानीस आणि अनुमोदक श्री सुरेशचंद्र पाध्ये होते.

*** ठराव क्रमांक ५.**
कायम स्वरुपी सोसायटी कॉर्पस फंड म्हणून प्रत्येक सभासदास रू. पाच लाख ह्या प्रमाणे रक्कम विकसका कडून घेणे.
या मुद्द्यावर मतदाना आधी सचिवांनी स्पष्ट केले की ही रक्कम सभासदांना न देता सोसायटी कडे असेल.
मतदानात हा ठराव ६९ विरुद्ध 0 मतांनी मंजूर झाला.
ह्या ठरावा चे सूचक श्री महेश प्रभुदेसाई आणि अनुमोदक श्री अनंत बेदरकर होते.

*** ठराव क्रमांक ६:**
पुनर्निर्माण योजनेसाठी निवड करण्यात आलेल्या विकसकाकडून रू. पन्नास कोटींची बँक गारेंटी स्वीकारणे.
मतदानात सदर ठराव ६९ विरुद्ध 0 मतांनी मंजूर झाला.
ह्या ठरावा च्या सूचक श्रीमती शुभांगी डुंबरे आणि अनुमोदक श्रीमती पद्मा राहूरकर होत्या.

*** ठराव क्रमांक ७:**
बांधकाम काळात सभासदांना त्यांच्या कडे सध्या असणाऱ्या जागेच्या प्रमाणात दर चौरस फूट रुपये पंचेचाळीस ह्या दराने घरभाडे आणि त्यात प्रतिवर्षी ५ टक्के वाढ मिळवणे.

सदर ठराव पण ६९ विरुद्ध 0 मतांनी मंजूर झाल्या चे सचिवांनी जाहीर केले.
ह्या ठरवा चे सूचक श्री मलय दातार आणि अनुमोदक श्री प्रकाश जोशी होते.

*** ठराव क्रमांक ८:**
सभासदांना त्यांच्या कडे सध्या असणाऱ्या जागेच्या प्रमाणात दर चौरस फूट रुपये दोनशे पन्नास दराने Refundable Deposit विकसकाकडून मिळविणे.

हा ठराव ६९ विरुद्ध 0 मतांनी संमत झाल्याचे सचिवांनी जाहीर केले.
सदर ठरावा चे सूचक श्री जयंत शाळिग्राम आणि सूचक श्री सुवर्णकांत ठाकोर होते.

***ठराव क्रमांक ९:**
सभासदांच्या सामानाची ने
विकसकाकडून मिळवणे.
आण करण्यासाठी प्रत्येक सभासदास एकूण रुपये पन्नास हजार
हा ठराव ही ६९ विरुद्ध 0 मतांनी संमत झाल्याचे सचिवांनी जाहिर केले.

ठरावा चे सूचक श्री जयंत शाळिग्राम आणि अनुमोदक श्री सुशीलकुमार जैन होते.
कार्यक्रम पत्रिकेनुसार सर्व मुद्द्यांवर मतदान झाल्याने आणि त्याचे निकाल जाहीर झाल्याने अध्यक्षांनी सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

**विनायक पटवर्धन सचिव**